अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०३ चा सरतपास

मी शपथेवर कथन करतो की,

नाव – केदार शशिकांत गोगटे,

वय — ४४ वर्षे, धंदा – इन्श्यूरन्स एजंट,

राह. – ओमकार नगर, कुडाळ.

सरतपास अभियोग पक्षातर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्री. कुंटे

**०१.** घटनेच्यावेळी मी कुडाळ येथील स्वतःच्या घरी आई, वडील, पत्नी, मुली सह राहत होतो. सदरचे घर स.क्र.१०७/अ/१/अ/१/५७ क्षेत्र ७ गुंठे या जागेवर आहे. सदरची जमीन माझ्या वडीलांनी खरेदी केली होती. या जमिनीच्या पूर्वेला रस्ता, दक्षिणेला नेरुरकर यांची जमीन, पश्चिमेला चव्हाण यांची जमीन आणि उत्तरेला पेडणेकर यांची जमीन आहे. या जमीनीच्या हद्दीवरुन आमच्यात आणि नेरुरकरांमध्ये वाद सुरु आहे. सदर जागेबाबत माझ्या वडीलांनी दिवाणी न्यायालय, कुडाळ येथे हरिश्चंद्र नेरुरकर यांचे विरुध्द दिवाणी दावा दाखल केलेला आहे. त्या दाव्यामध्ये न्यायालयाने नेरुरकरांविरुध्द मनाई आदेश पारीत केला होता.

**०२.** दिनांक २०/०४/२०१८ रोजी सकाळी ६.३० वाजता माझी पत्नी आमच्या हद्दीतील अनंताच्या झाडाची फूले काढण्यासाठी गेली होती. तेव्हा हरिश्चंद्र नेरुरकर त्याच झाडाची फूले काढत होते. त्यावेळी माझ्या पत्नीने त्यांना विचारले की, कोर्टाचा मनाई आदेश असताना तुम्ही या बाजूला का येता ? आणि फुले का काढता ?. त्यावर हरिश्चंद्र नेरुरकर यांनी तिला शिवीगाळ केली व मला कोर्टाचा आदेश मान्य नाही, तुम्ही काय करायचे ते करा असे बोलू लागले. त्यावेळी मी देखील त्यांना समजावून सांगण्याचा प्रयत्न केला, परंतू त्यांनी ऐकले नाही. तेथे हरिश्चंद्र नेरुरकर यांची पत्नी तारमती सुध्दा आली. त्यावेळी तारामती

नेरुरकर यांनी माझ्या पत्नीला थोबाडात मारले व ढकलून देऊन खाली पाडले. मी तेथे सोडवण्यासाठी गेलो तेव्हा हरिश्चंद्र नेरुरकर यांनी माझ्या पत्नीचा गळा आवळण्याचा प्रयत्न केला त्यात तिच्या गळ्यातील मंगळसूत्र तुटले. मी हरिश्चंद्र यांना ढकलून दिले व माझ्या पत्नीने तारामती हिला बाजूला करुन स्वतःची सोडवणूक केली.

०३. तुटलेले मंगळसूत्र तेथेच पडल्याने आम्ही ते शोधत असताना हरिश्चंद्रने मला काठीने पायावर मारले, तसेच माझ्या पत्नीला देखील काठीने मारले. सदरचा आवाज ऐकून माझे आई वडील तेथे आले असता त्यांना जांभ्याचे दगड व फरशीचे तुकडे फेकून मारले, मात्र ते त्यांना लागले नाहीत. सदर घटनेबाबत माझ्या पत्नीने पोलीस स्टेशनला दिनांक २०/०४/२०१८ रोजी तक्रार दिली होती. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी करुन जबाब नोंदवला. मला ज्या काठीने मारले ती काठी आणि घटनेच्या वेळी वापरलेले जांभ्याचे दगड व फरशीचे तुकडे दाखवल्यास ओळखू शकतो. आता मला वस्तू अ, ब, क दाखविण्यात आल्या, त्या त्याच आहेत. मी हरिश्चंद व त्यांच्या पत्नीला ओळखतो ते आज न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पूर्ण.**

<u>उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. खानोलकर यांचेमार्फत</u>

०४. हे म्हणणे खरे आहे की, मी ब्राम्हण समाजाचा असून माझा पौरोहित्याचा व्यवसाय आहे. लक्ष्मण घाटे हे ब्राम्हण समाजाचे असल्याचे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आणि लक्ष्मण घाटे एकाच समाजाचे असल्याने आमचे चांगले संबंध आहेत. लक्ष्मण घाटे गावात राहतात एवढेच मला माहित आहे, माझी त्यांच्याशी ओळख नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे चांभार समाजाचे आहेत.

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. १०७/अ/१ हि.क्र. ५७ ही जमीन माझ्या वडीलांनी बर्डे यांचेकडून सन १९७७–७८ साली खरेदीखताने विकत घेतली. हे म्हणणे खरे आहे की, नियमीत दिवाणी मुकदमा क्र. ३३/२०१५ कुडाळ न्यायालयाने दिनांक २२/०१/२०१९ रोजी फेटाळला. हे म्हणणे खरे आहे की, या निकाला विरुध्द मी जिल्हा न्यायालयात दिवाणी अपील क्र. ३१/२०१९ दाखल केले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०७/०७/२०२३ रोजी जिल्हा न्यायालयाने सदरचे अपील फेटाळले. हे म्हणणे खरे आहे की, या निकाला विरुध्द मी अद्याप मा. उच्च न्यायालयात अपील दाखल केलेले नाही.

**०६.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपींचे घर उंच भागात आहे आणि माझे घर सखल भागात आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आणि आरोपीच्या मिळकतीच्यामध्ये सहा फूट उंचीची संरक्षक भिंत आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या मिळकतीमध्ये त्यांची दोन घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ओमकार नगर, वरची कुंभारवाडी येथे दहा ते पंधरा घरे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, हुरलीकुप्पी, पेडणेकर, चव्हाण, पाटील व रेडकर यांची घरे आमच्या घराशेजारी आहेत.

**०७.** अनंताच्या झाडाची उंची दोन ते तीन फूट होती. साक्षीदार पून्हा सांगतात की, अनंताच्या झाडाची उंची दोन ते तीन मीटर आहे. एक मीटर म्हणजे ३.३ फूट आहे. हे म्हणणे खरे नाही की, अनंताच्या झाडाची उंची जास्तीत जास्त पाच ते साडे पाच फूट असते. हे म्हणणे खरे नाही की, अनंताच्या झाडाची फूले काढण्यासाठी वस्तू क वरील काठीची गरज नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी मी आणि माझ्या पत्नीने आरोपींना शिवीगाळ व मारहाण केल्याची तक्रार त्यांनी पोलीस स्टेशनला दिली होती. हे म्हणणे खरे आहे की,

त्या तक्रारी वरुन माझ्या आणि माझ्या पत्नी विरुध्द याच न्यायालयात नियमीत फौजदारी खटला क्र. ३८/२०१९ सुरु आहे. हे म्हणणे खरे आहे की, जमीनीच्या वादावरुन माझ्या कुटुंबियांची व आरोपींची बोलचाल नाही.

०८. मी आणि माझी पत्नी कुडाळ पोलीस स्टेशनला सकाळी ०७.०० वाजता गेलो. पोलीसांनी आमची तक्रार २.३० ते ३.०० वाजता लिहून घेतली. आम्ही पोलीस स्टेशनला एक तास होतो. त्यावेळे दरम्यान आम्ही पोलीसांना घटनेची माहिती दिली. पोलीस स्टेशनमधून आम्ही दोघं हॉस्पीटलला ०८.३० वाजता गेलो. माझा जबाब पोलीस स्टेशनला घेतला. घटना साधारणतः अर्धा तास चालू होती. घटनेच्या जागी कोणीही लोक जमा झालेली नव्हती. आम्ही आरडाओरडा केला होता.

०९. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाच्या पूर्वेला रहदारीचा रस्ता आहे आणि त्या रस्त्यावरुन लोकांची सतत ये–जा सुरु असते. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळाजवळ चंद्रकला रेडकर यांचे घर आहे. घटनास्थळी आम्हाला सोडविण्यासाठी चंद्रकला रेडकर आली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अनंताचे झाड आरोपींच्या ताब्यातील जमीनीवर आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या झाडाची फूले आरोपी हाताने काढीत असताना माझ्या पत्नीने तेथे जावून त्यांना शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीने तारामती हिला काठीने ढकलले त्यात तिच्या कमरेला, डोक्याला आणि हाताला मार लागला, तसेच मी तेथे जावून दगड मारला तो आरोपी क्र. १ च्या डोक्याला लागून त्याला दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की, या घटनेची तक्रार आरोपींनी ताबडतोब पोलीस स्टेशनला दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या आरोपातून सुटण्यासाठी मी आणि माझ्या पत्नीने आरोपीं विरुध्द खोटी तक्रार दिली.

**१०.** माझे घर आणि पोलीस स्टेशन यामधील अंतर दोन ते तीन कि.मी. आहे. माझे आणि आरोपीच्या घरातील अंतर दहा ते पंधरा मीटर आहे. मी पोलीसांना आरोपीने कोणत्या शब्दात शिवीगाळ केली हे सांगितले नव्हते. कोणत्या शब्दात शिवीगाळ केली हे पोलीसांना सांगण्यास मला काही अडचण नव्हती. घटनेमध्ये माझ्या किंवा माझ्या पत्नीच्या अंगावरील कपड्यांवर रक्ताचे डाग पडलेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींना मारहाण करुन पळून जात असताना मी आणि माझी पत्नी उंच सखल भागावर घसरुन पडलो आणि आम्हाला दुखापत झाली.

**११.** मी माझ्या जबाबात पोलीसांना "जमिनीच्या पूर्वेला रस्ता, दक्षिणेला नेरुरकर यांची जमीन, पश्चिमेला चव्हाण यांची जमीन आणि उत्तरेला पेडणेकर यांची जमीन आहे" असे सांगितले नव्हते, परंतू तसे सांगण्यास मला काही अडचण नव्हती. मी पोलीसांना जबाब देताना "माझ्या पत्नीने त्यांना विचारले की, कोर्टाचा मनाई आदेश असताना तुम्ही या बाजूला का येता ? आणि फुले का काढता ?" असे सांगितले होते, परंतू तसे माझ्या जबाबात का नमूद नाही हे मी सांगू शकत नाही. मी पोलीसांना जबाब देते वेळी "आरोपींनी शिवीगाळ केली व मला कोर्टाचा आदेश मान्य नाही, तुम्ही काय करायचे ते करा असे बोलू लागले" असे सांगितले नव्हते, परंतू तसे सांगण्यास मला काही अडचण नव्हती. मी पोलीसांना जबाब देतेवेळी "आरोपींनी जांभा दगडाने माझ्या वडीलांना मारले" असे सांगितले नव्हते, परंतू तसे सांगण्यास मला काही अडचण नव्हती.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०७/११/२०१४ रोजी आरोपींनी त्यांच्या मिळकतीची मोजणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे क्र. १०७/अ/१/अ/१/६१ या मिळकतीची मोजणी करण्यात आली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदरची मिळकत आरोपी व इतर सह हिस्सेदारांची आहे. हे

म्हणणे खरे नाही की, आरोपींनी त्यांची मिळकत सोडून जावी अशी आमची इच्छा असल्याने आम्ही त्यांना त्रास देत असतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपींच्या मिळकतीमध्ये अतिक्रमण करुन नेहमी त्यांना त्रास देण्याचा प्रयत्न करतो. हे म्हणणे खरे नाही की, याच कारणावरुन घटनेच्या दिवशी मी आणि माझ्या पत्नीने आरोपींना मारहाण केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी पोलीसांना खोटा जबाब दिला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, वस्तू अ, ब, क शी आरोपींचा कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपूर्ण मजकूर खोटा आहे.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

सही/–

(श्रीम. व्ही. आर. जांभुळे)

दिनांकः १३/०२/२०२५.

मुख्य न्यायदंडाधिकारी,

सिंधुदुर्ग – ओरोस.